नियम आणि अटी - ATM डेबिट कार्ड

डेबिट कार्ड हे बँकेद्वारे तिच्या ग्राहकांना जारी केलेले, बचत बँक किंवा चालू खात्याशी संलग्न एक फिजिकल किंवा व्हर्च्युअल कार्ड आहे, जे रोख रक्कम काढण्यासाठी, ऑनलाइन भरणा करण्यासाठी, PoS टर्मिनल/ क्विक रिस्पॉन्स (QR) कोड व्यवहार करण्यासाठी, पैसे हस्तांतरण करण्यासाठी आणि वेळोवेळी बँकेद्वारे लागू केलेले इतर व्यवहार करण्यासाठी वापरले जाऊ शकते.

1. **व्याख्या**
   या भागात वापरलेले गेलेले मोठ्या लिपितील शब्द, परंतु ज्यांची व्याख्या इथे दिलेली नाही, त्या शब्दांचा अर्थ तोच असेल जो खात्यासाठी सर्वसामान्यपणे लागू होणाऱ्या नियम अटींच्या अंतर्गत त्यांना दिला गेलेला आहे. या विभागात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक असेल तर:

   a. "**खात्यातील व्यवहार**" म्हणजे ATM/डेबिट कार्ड वापरून खात्यात केलेले खालीलपैकी कोणतेही किंवा सर्वच व्यवहार :

      i. ATM/ मायक्रो ATM मधून रोख रक्कम काढणे;

      ii. ATM/ मायक्रो ATM मधून खात्याची माहिती मिळवणे;

      iii. ATM/ मायक्रो ATM वापरून ATM PIN बदलणे;

      iv. एखाद्या उपकरणाद्वारे रोख/ धनादेश किंवा इतर आर्थिक साधन जमा करणे; आणि EDC(s) किंवा ऑनलाइन वापरून व्यापारी आस्थापनेतील व्यवहार जे खात्यात उपलब्ध शिलकेच्या अधीन आहे.

   b. **साधन**" म्हणजे खालीलपैकी कोणतेही आणि सर्वच साधन असेल:

      i. ATM

      ii. मायक्रो ATM

      iii. POS आणि

      iv. कार्ड व्यवहार सुलभ करण्यासाठी RBI किंवा कार्ड नेटवर्क द्वारे मंजूर केलेले इतर कोणतेही साधन.

   c. "**PIN**" म्हणजे कार्डधारकाने स्वतः सेट केलेला गोपनयी वैयक्तिक ओळख क्रमांक. साधनांवर कोणतेही आर्थिक किंवा बिगर-आर्थिक व्यवहार करण्यासाठी सदर PIN आवश्यक असेल.

   d. "**Card धारक किंवा धारक**" म्हणजेच ATM/ डेबिट कार्डाचा सध्याचा धारक, मग तो ग्राहक किंवा या संदर्भात ग्राहकाच्या वतीने योग्यप्रकारे अधिकृत आणि बँकेसाठी स्वीकार्य असलेली व्यक्ती आहे.

e. "**EDC**" म्हणजेच कोणतेही इलेक्ट्रॉनिक डेटा कॅप्चर टर्मिनल, मग ते बँकेचे किंवा शेयर्ड नेटवर्कचे असेल, ज्यावर, इतर गोष्टींसोबतच, ग्राहक खात्यातील निधी ॲक्सेस करण्यासाठी ATM/डेबिट कार्ड वापरू शकतो.

f. "**व्यापारी आस्थापना**" म्हणजेच आस्थापना ज्या बँकेद्वारे जारी केलेल्या ATM/डेबिट कार्डे मान्य करतात आणि यामध्ये इतरांचा समावेश असू शकतो जसे स्टोर, दुकाने, हॉटेल, एयरलाइन संस्था आणि मेल ऑर्डर जाहिरातदार (मग ते किरकोळ विक्रेते, वितरक किंवा निर्माते असतील), ई-कॉमर्स संकेतस्थळे.

g. "**POS**" म्हणजेच पॉइंट ऑफ सेल्स टर्मिनल्स मग ते भारतातील किंवा परदेशातील असेल, मग ते बँकेचे किंवा शेयर्ड नेटवर्कचे असेल, ज्यावर, इतर गोष्टींसोबतच, ग्राहक खात्यातील निधी ॲक्सेस करण्यासाठी ATM/डेबिट कार्ड वापरू शकतो.

h. "**ऑनलाइन**" म्हणजेच व्यापाऱ्याच्या संकेतस्थळ किंवा ॲप्लीकेशनवर केलेले व्यवहार. अशा व्यवहारांना कार्ड नॉट प्रेझेंट व्यवहार म्हणून सुद्धा ओळखले जातात.

i. "**संपर्क आधारित व्यवहार**" हा व्यवहाराचा एक प्रकार आहे जो PoS टर्मिनलवर डेबिट कार्ड आत ठेवून किंवा टाकून केला जातो.

j. "**संपर्करहित (कॉन्टॅक्टलेस) व्यवहार**" हा व्यवहाराचा एक प्रकार आहे जो डेबिट कार्ड फक्त PoS टर्मिनलवर अलगद स्पर्श करून केला जातो.

2. **वापराच्या सर्वसामान्य अटी आणि नियम :**

a. कार्ड धारक सहमत आहे कि बँकेने त्याच्या/तिच्या विनंतीवर कार्ड जारी केलेले आहे आणि या अटी व नियम आणि खात्यास लागू असलेल्या सर्व व नियमांच्या अधीन, बँक तिच्या विवेकाधिकाराने, प्रत्येक धारकाला, एक ATM/डेबिट कार्ड जारी करेल. ATM/डेबिट कार्ड हस्तांतरणीय नाही. धारक कोणत्याही साधनावर खात्यातील व्यवहार करण्यासाठी ATM/डेबिट कार्ड वापरू शकतो. पुढे, कार्डधारक सहमत आहे कि तो/ती त्याचे/तिचे कार्ड कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीला देणार नाही आणि कार्ड त्याच्या/तिच्या ताब्यात राहील.

b. कार्डधारक सहमत आहे कि खाते उघडताना किंवा कार्ड घेताना त्याला/तिला कार्डाच्या विशेषता, फायदे आणि शुल्कांविषयी सविस्तरपणे माहिती देण्यात आलेली आहे.

c. कार्डधारक सहमत आहे कि डेबिट कार्ड घेण्यासाठी ग्राहकाने दिलेली माहिती खरी आहे आणि यामध्ये कोणताही बदल झाल्यास बँकेला कळवली जाईल.

d. कार्डधारक समजतो आणि सहमत आहे कि कार्ड हरवल्यास कोणतेही आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तो याविषयी बँकेला ताबडतोब कळवेल.

e. कार्डधारक सहमत आहे की तो/ती कार्ड सुरक्षितपणे आपल्या ताब्यात ठेवेल आणि कार्ड सुरक्षित करण्यासाठी बँकेद्वारे दिलेले पर्याय वापरेल जसे ऑनलाइन व्यवहारासाठी कार्ड

टोकनायझेशन, आवश्यक नसलेले व्यवहार बंद करणे, पसंतीची मर्यादा निश्चित करणे आणि नियमित व्यवहारांनी कार्ड सक्रिय ठेवणे.

f. कार्डधारक समजतो की बँक कोणतेही भौतिक PIN पाठवत नाही आणि PIN निर्मितीची प्रक्रिया मोबाइल बँकिंग किंवा इंटरनेट बँकिंग किंवा बँकर ऑन सेल (BOC) द्वारे ऑनलाइन आहे. पुढे, कार्डधारकाच्या विशिष्ट विनंतीच्या प्रकरणी बँक भौतिक PIN उपलब्ध करून देईल आणि अशा प्रकरणी कार्डधारक मान्य करतो कि तो/ती भौतिक PIN ने कार्ड सक्रिय केल्यानंतर PIN ताबडतोब शेयर करेल.

g. कार्डधारक समजतो कि त्याने/तिने डेबिट कार्ड नाकारल्यास, ते ATM किंवा PoS व्यवहार करू शकणार नाही जेथे भौतिक कार्ड आवश्यक आहे.

h. कार्डधारक समजतो कि सुधारित सुरक्षा पुरवण्यासाठी, त्यांचे कार्ड निष्क्रिय स्वरुपात पाठवले गेले आहे आणि सक्रिय केल्यानंतर फक्त देशांतर्गत ATM आणि देशांतर्गत PoS व्यवहार काम करू शकतात. आंतरराष्ट्रीय ATM, आंतरराष्ट्रीय PoS, ऑनलाइन आणि कॉन्टॅक्टलेस व्यवहार करण्यासाठी कार्डधारकास ते सक्रिय करुन त्यांच्या पसंतीची मर्यादा सेट करावी लागेल.

i. कार्डधारक समजतो कि डेबिट कार्ड वापरून आंतरराष्ट्रीय व्यवहार टॅक्स कलेक्शन ॲट सोर्स (TCS) च्या अधीन आहेत आणि त्यावर लागू दर वेळोवेळी भारत सरकारद्वारे निहित केलेले असतील. कार्डधारक पुढे समजतो आणि सहमत आहे कि बँकेद्वारे भारत सरकारला भरणा केलेल्या TCS च्या संदर्भात कोणत्याही वसूलीच्या प्रकरणी, कार्डधारक त्यांच्या खात्यांमध्ये पुरेशी शिल्लक ठेवेल. वसूली होऊ न शकल्यास, बँक कायदेशीर कारवाई सुरु करू शकते.

j. कार्डधारक कोणत्याही बदलाच्या प्रकरणी कार्डशी संलग्न खात्यातील त्याचे/तिचे संपर्काचे तपशील अपडेट करण्यासाठी सहमत आहे. मोबाइल क्रमांक, ईमेल आयडी, पत्र व्यवहाराचा पत्ता या सारखी माहिती सर्व वेळी अद्यावत केली जाईल.

k. कार्डधारक सहमत आहे की ATM मध्ये, कॉन्टॅक्टलेस किंवा कॉन्टॅक्ट सह PoS, EDC किंवा ऑनलाइन केलेल्या व्यवहारानंतर मोबाइलवर व्यवहाराचे संदेश त्यांना प्राप्त होत नसल्यास तो/ती बँकेला कळवेल.

l. डेबिट कार्डाच्या व्यावसायिक वापराची परवानगी नाही आणि अशा व्यवहारांसाठी ग्राहकांना दिलेले कोणतेही रिवॉर्ड पॉइंट/ कॅशबॅक परत घेण्याचा/ थांबवून ठेवण्याचा अधिकार बँकेकडे राखीव आहे.

m. बँक तुमच्या IDFC FIRST डेबिट कार्डावरील विमा लाभासाठी वारसदार म्हणून खात्याच्या पातळीवर अद्यावत केलेल्या वारसाला ग्राह्य धरेल आणि RBI मास्टर निर्देश - क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्ड - जारी करणे आणि आचार निर्देश, 2022 च्या अनुषंगाने आमच्या विमा भागीदारासोबत ते शेयर करेल. वारसादर अद्यावत करणे म्हणजेच पहिल्यांदा अद्यावत करणे आणि/किंवा वारसदार बदलण्याची सुविधा आमच्या मोबाइल बँकिंग / नेट बँकिंग द्वारे उपलब्ध आहे आणि यासाठी तुम्ही आमच्या बँकेच्या शाखेत सुद्धा भेट देऊ शकता.

n. आयकर प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, आंतरराष्ट्रीय व्यवहार करण्यासाठी PAN उपलब्ध असणे (अनिवासी ग्राहक वगळून) अनिवार्य आहे. पुढे 1 जुलै 2023 पासून, तुमचे PAN निष्क्रिय होईल जर ते आधार सोबत जोडलेले नसेल (फक्त सूटप्राप्त श्रेणी वगळून)* आणि अशा प्रकरणी तुम्ही आंतरराष्ट्रीय व्यवहार करू शकणार नाही. अधिक माहितीसाठी, कृपया **इथे क्लिक करा.**

o. याव्यतिरिक्त, PAN निष्क्रिय असल्यास, PAN आणि आधार जोडून आणि ते बँक प्रणालीमध्ये दिसेपर्यंत ग्राहक मोबाइल बँकिंग/ नेट बँकिंग मधून (ATM, POS, E-Com साठी) आंतरराष्ट्रीय व्यवहार सुविधा सक्षम करू शकणार नाही.

p. **PIN सुरक्षित करणे:**

1. PIN ची सुरक्षा सर्वात महत्त्वाची आहे आणि कार्डधारकाने तो गोपनीय ठेवला पाहिजे आणि कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीसमोर उघड करू नये. कार्डधारकाला सल्ला दिला जातो की त्यांनी PIN लक्षात ठेवावा आणि कार्डच्या मागे लिहून ठेवू नये. धारकाने याची सुद्धा खात्री केली पाहिजे कि PIN प्रविष्ट करत असताना तो कुणीही पाहिल्याचे टाळण्यासाठी साधन झाकलेले आहे. पुढे, धारक खात्री करेल कि तो/ती :
    a. कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही व्यक्तीसमोर PIN उघड करणार नाही आणि कोणत्याही साधनात PIN प्रविष्ट केला जात असताना कुणीही तो पाहण्यापासून रोखेल आणि कोणत्याही व्यक्तीला तो कळण्यापासून रोखण्यासाठी शक्य तितकी सर्व काळजी घेईल;
    b. ATM/ डेबिट कार्डावर PIN लिहून ठेवणार नाही किंवा सूचवणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे PIN ची नोंद ठेवणार नाही;
    c. PIN ची कोणत्याही प्रकारे कोणतीही भौतिक नोंद ठेवणार नाही ज्यायोगे कुणीही व्यक्ती ती मिळवू शकेल;
    d. कव्हर/ पत्र/ लिफाफ्यावर दिलेल्या सर्व खबरदारींचे पालन करेल ज्यामध्ये PIN पाठवला गेला आहे.
    e. कार्ड डेटा सुरक्षिततेसाठी व्यापारी आस्थापना किंवा EDC मध्ये कार्डधारकाच्या समोर व्यवहार केल्याची खात्री करेल.
2. ATM/डेबिट कार्डच्या गैरवापराद्वारे आणि/किंवा कोणत्याही तिसऱ्या पक्षाच्या हातात पडल्या किंवा PIN च्या गैरवापराद्वारे आणि/किंवा कोणत्याही तिसऱ्या पक्षाला माहित झाल्यास PIN च्या फसव्या/अनिधकृती वापरासाठी ग्राहक किंवा धारक कुणीही बँकेला जबाबदार ठरवणार नाही. ATM/ डेबिट कार्ड आणि/किंवा PIN च्या फसव्या/अनधिकृत वापरामुळे आणि/किंवा अशा गैरवापरामुळे बँकेला झालेल्या नुकसानासह कोणत्याही नुकसान, हानी, व्यय, शुल्क किंवा खर्चासाठी पूर्णपणे

ग्राहक जबादार असेल. जर ग्राहक या सुरक्षा आवश्यकतांचे पालन करण्यात अयशस्वी ठरतो आणि यामुळे PIN सोबत तडजोड होते, तर त्यामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी तो/ती जबाबदार आणि उत्तरदायी असेल.

3. **ATM/डेबिट कार्डाचे रद्दीकरण:** खाते कायमस्वरुपी बंद झाल्यास किंवा तात्पुरते चालू न राहिल्यास किंवा कोणत्याही कारणांमुळे खात्यातील सेवा कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या काढून घेतल्या जातात, तर ATM/ डेबिट कार्डाचा उपयोग आपोआप समाप्त होईल. बँकेच्या स्वतःच्या विवेकाधिकाराने ATM/डेबिट कार्डचा वापर रद्द, निलंबित किंवा संपुष्टात आणण्याच्या बँकेच्या अधिकाराविषयी पूर्वग्रह न ठेवता, ग्राहक मोबाइल बँकिंग किंवा नेट बँकिंग द्वारे किंवा शाखेमध्ये कॉल करुन किंवा बँकर ऑन कॉल द्वारे ATM/ डेबिट कार्ड ब्लॉक करुन स्वेच्छेने ATM/ डेबिट कार्ड रद्द करण्याची बँकेला विनंती करू शकतो. धारकाकडून अशी विनंती/ सूचना प्राप्त झाल्यावर, बँक ATM/ डेबिट कार्ड आणि PIN ताबडतोब रद्द करेल आणि याची पोच देईल. कार्ड रद्द केल्याची किंवा ब्लॉक केल्याची सूचना न मिळाल्यास ते बँकेला कळवण्यासाठी कार्डधारक सहमत आहे. रद्द केल्यावर, ATM/ डेबिट कार्ड आणि PIN पुन्हा वापरला जाऊ नये मग भलेही नंतर तो सापडतो.

4. **ATM/ डेबिट कार्ड हरवणे किंवा चोरीला जाणे किंवा PIN उघड करणे** : धारकाला जसे शंका येते कि ATM/ डेबिट कार्डाचा दुरुपयोग झाला आहे, हरवले आहे किंवा चोरीला गेले आहे किंवा होऊ शकते किंवा PIN कुणाला कळले आहे तर त्यांनी लगेचच बँकेला कळवले पाहिजे. धारकाकडून कार्ड हरवल्याची/ चोरी झाल्याची सूचना दिली जाण्याच्या आधी कार्डाच्या दुरुपयोगामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानासाठी बँक जबाबदार असणार नाही, जोपर्यंत बँकेद्वारे वेळोवेळी बँकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या अटी व नियमांच्या आधारे धारकास "हरवलेल्या कार्डचे दायित्व" कवर साठी पात्र मानले जात नाही. धारक किंवा ग्राहकाकडून विनंती/ सूचना मिळाल्यावर, बँक ATM/ डेबिट कार्ड ब्लॉक करेल आणि ईमेल किंवा SMS द्वारे पुष्टी करेल. ब्लॉक केल्यावर, ATM/ डेबिट कार्ड पुन्हा वापरले जाऊ शकणार नाही मग भलेही नंतर ते सापडते. मात्र, ATM/ डेबिट कार्डचा गैरवापर, नुकसान किंवा चोरी झाल्याच्या किंवा PIN उघड झाल्याच्या/ कोणत्याही व्यक्तीला ATM/ डेबिट कार्ड आणि/किंवा PIN चे ॲक्सेस मिळाल्याच्या प्रकरणी, ग्राहकाने/ धारकाने ताबडतोब बँकेला कळवले पाहिजे आणि एफआयआर नोंदवून नंतर त्याची प्रत बँकेला सुद्धा पाठवली पाहिजे. ग्राहकाद्वारे ATM/ डेबिट कार्ड/ PIN हरवल्याचे बँकेला कळवेपर्यंत आणि अशा कळवल्याने त्याचा वापर स्थगित केला जाईपर्यंत उल्लेखित ATM/ डेबिट कार्ड/ PIN वर लागलेल्या सर्व शुल्कांसाठी ग्राहक जबाबदार असेल. बँक, ग्राहकाला/ धारकाला संदर्भ किंवा सूचना न देता, ATM/ डेबिट कार्ड/ PIN हरवणे किंवा चोरी झाल्याविषयी कोणतीही माहिती पोलिसांना किंवा इतर संबंधित अधिकाऱ्यांना देऊ शकते. पुढे, ATM/ डेबिट कार्डाचा गैरवापर झाल्याच्या, हरवल्याच्या किंवा चोरी झाल्याच्या किंवा कोणत्याही तिसऱ्या पक्षाकडे PIN उघड झाल्याच्या/ उपलब्ध

झाल्याच्या लिखित पुष्टीकरणाची प्रत पोलिस तक्रारीच्या प्रतिसोबत बँकेकडे जमा केली गेली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीमध्ये आणि/ किंवा कोणत्याही वेळी ATM/ डेबिट कार्ड आणि/किंवा PIN च्या कोणत्याही गैरवापरासाठी बँक जबाबदार असणार नाही. यामुळे ग्राहकाद्वारे अर्ज केल्यावर बँकेद्वार नंतर जारी केलेले कोणतेही बदली ATM/ डेबिट कार्ड आणि PIN या अटी आणि नियमांद्वारे नियंत्रित केले जाईल.

5. **ATM/ डेबिट कार्ड चा वापर आणि गैरवापराची जबाबदारी :**

a. सर्व धारक आणि ग्राहक, संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे, स्वीकारतात आणि सहमत आहेत कि, ग्राहकाच्या विनंतीने आणि जोखमीने, बँक धारकाला (धारकांना) ATM/ डेबिट कार्ड वापरून खात्यातील व्यवहार करण्याची सुविधा देण्यास सहमत झाली आहे. मात्र, ATM/ डेबिट कार्डाचा वापर खात्यामध्ये योग्य जमा रक्कम ठेवण्याच्या अधीन आहे.

b. ATM/ डेबिट कार्ड द्वारे रोख रक्कम काढण्याची सुविधा बँकेच्या सर्वोत्तम प्रयत्नांच्या आधारे उपलब्ध करून देण्यात आली आहे आणि ग्राहक सहमत आहे कि ATM मधील बिघाडामुळे किंवा ATM मध्ये पुरेशी रोख शिल्लक नसल्यामुले किंवा ATM स्थळ बंद असल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे ग्राहक ATM मधून रोख काढू शकत नसल्याच्या प्रकरणी ते कोणत्याही परिणामांसाठी कोणत्याही प्रकारे बँकेला जबाबदार किंवा उत्तरदायी ठरवणार नाही.

c. ग्राहक याद्वारे बँकेला कोणत्याही आणि सर्व खाते व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी अपरिवर्तनीयपणे अधिकृत करतो, मग भलेही ते वैधपणे किंवा इतर प्रकारे आणि धारकाद्वारे किंवा खात्याच्या कोणत्याही संयुक्त धारकाद्वारे किंवा इतर कोणत्याही पक्षाद्वारे केलेले असेल. ग्राहक ATM/ डेबिट कार्डाचा लाभ घेताना/ वापरताना लागू होणाऱ्या सर्व कायद्यांचे/ प्रक्रियांचे पालन करण्याचे वचन देतो.

d. ATM/ डेबिट कार्डाद्वारे कोणत्याही साधनावर केलेल्या खात्यातील व्यवहारांसाठी सर्वच परिस्थितींमध्ये ग्राहक संपूर्ण जबाबदारी आणि उत्तरदायित्व स्वीकारतो मग भलेही सदर खात्यातील व्यवहार ग्राहकाच्या माहितीने प्रक्रिया केलेले असेल किंवा नसेल. ATM/ डेबिट कार्डाच्या संदर्भात/ उपयोगाद्वारे दिलेली कोणतीही सूचना अपरिवर्तनीय असेल. ग्राहक बँकेला या द्वारे कोणत्याही आहरण किंवा हस्तांतरणाची रक्कम खात्यातून कापण्यासाठी किंवा बँकेच्या व्यवहाराच्या नोंदीनुसार कोणत्याही ATM/ डेबिट कार्डाच्या वापराद्वारे प्राप्त झालेली अशी कोणतीही सूचना पूर्ण करण्यासाठी अधिकृत करतो, ज्यास ग्राहक अंतिम आणि निर्णायक म्हणून स्वीकारण्यासाठी सहमत आहे.

e. जागतिक आणि देशांतर्गत फसवणूक आणि गैरवापरांच्या प्रवृत्तींच्या आधारे ग्राहकाच्या कार्ड आणि खात्याची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी बँक योग्य नियंत्रणे लागू करत राहील.

f. बँक सर्व माध्यमांवरील (ATM, PoS आणि ऑनलाइन सह) आंतरराष्ट्रीय डेबिट कार्ड व्यवहार प्रतिबंधित करेल, जर ते उच्च जोखिम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अधिकारक्षेत्रातून सुरु होत असतील. उच्च-जोखिम असलेल्या देशांची निश्चिती FATF किंवा संबंधित नियामक अधिकाऱ्यांद्वारे जारी केलेल्या मार्गदर्शन आणि निर्देशांच्या आधारे असेल. अशा देशांमध्ये व्यवहार करताना ग्राहकाने खबरदारी बाळगली पाहिजे.

g. ग्राहक समजतो, सहमत आहे आणि वचन देतो कि :

i. ATM/ डेबिट कार्डद्वारे खात्यातील व्यवहारांवर कारवाई करण्यासाठी आणि त्याच्या अनुषंगाने ग्राहक बँकेला जबाबदार ठरवणार नाही.

ii. बँकेला, तिच्या विवेकाधिकाराने, कोणतेही कारण न देता, ATM/ डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा आणि/किंवा त्याच्याशी संबंधित सेवा मागे घेण्याचा, बंद, रद्द, स्थगित किंवा समाप्त करण्याचा अधिकार आहे आणि अशा कारवाईमुळे कोणत्याही प्रकारे ग्राहकाला झालेल्या कोणत्याही हानि किंवा नुकसान किंवा ग्राहकाने केलेल्या दाव्यासाठी जबाबदार राहणार नाही. अशी कारवाईने तातडीने आणि कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय होऊ शकते जर बँकेच्या मते परिस्थिती तशी मागणी करते.

iii. ATM/ डेबिट कार्डाच्या वापरावर किंवा खात्यावरील व्यवहाराच्या स्वरुपावर देखरेख करण्याच्या बँकेच्या अक्षमतेविषयी पूर्वग्रह न ठेवता, बँक तिच्या विवेकाधिकाराने परंतु या संदर्भात कोणत्याही बंधन, उत्तरदायित्व किंवा जबाबदारीशिवाय, अशा कोणत्याही सूचनेची पूर्तता न करण्याचा निर्णय घेऊ शकते जेथे बँकेला असा विश्वास असण्याचे कारण आहे कि सूचना खऱ्या नाहीत किंवा शंकास्पद आहेत किंवा अन्यथा अयोग्य आहेत आणि कोणत्याही कारणासाठी अंमलात आणल्या जाऊ शकत नाही.

iv. बँक, तिच्या विवेकाधिकाराने, बँकेच्या परिसरातील/ यंत्रातील/ उपकरणाती आणि/किंवा कोणत्याही शेयर्ड नेटवर्कवरील बँकेच्या सुविधांचा ग्राहकांद्वारे ॲक्सेस/ उपस्थिती/ वापर कॅमेराने व्हिडीयोटेप किंवा रेकॉर्ड करू शकते आणि ग्राहक समजतो आणि स्वीकारतो कि बँक कोणत्याही कार्यवाहीमध्ये पुरावा म्हणून अशा क्लिपिंगच्या छायाचित्रणावर अवलंबून राहू शकते.

v. ग्राहकाद्वारे सुरु केलेले खात्यातील व्यवहार फक्त तेव्हाच पूर्ण होतील जर लागू होणाऱ्या कोणत्याही शुल्क/ फी इत्यादी सह व्यवहाराची रक्कम पूर्ण करण्यासाठी निधी स्पष्ट आणि पुरेशी आहे. पूर्ण झालेल्या प्रत्येक व्यवहाराची रक्कम खात्यातून ताबडतोब कापली जाईल.

vi. जर ग्राहकाने दिलेली कोणतीही सूचना बँकेद्वारे एकपेक्षा अधिक प्रकारे पूर्ण करण्यासाठी सक्षम आहे, तर बँक तिच्या विवेकाधिकाराने अशा प्रकारांपैकी कोणत्याही एकाद्वारे सदर सूचना पूर्ण करू शकते.

vii. बँक कोणत्याही कारणामुळे ATM/ डेबिट कार्डाची सुविधा पुरवण्यात अयशस्वी राहण्यासाठी जबाबदार नसेल, ज्यामध्ये कोणत्याही इलेक्ट्रॉनिक किंवा इतर प्रणाली किंवा प्रणालीशी संबंधित बिघाड, व्यत्यय, अनपेक्षित घटना किंवा बँकेच्या नियंत्रणाबाहेरील इतर परिस्थितींचा समावेश आहे, परंतु हे इतकेच मर्यादित नाही.

viii. धारक खात्री करेल कि ATM/ डेबिट कार्ड द्वारे सुरु केलेले सर्व खात्यातील व्यवहार व्यवस्थितपणे समाप्त केले जाहेत जेणेकरुन इतर कुणीही व्यक्ती खात्यावर व्यवहार करू शकणार नाही;

ix. जर ATM/ डेबिट कार्ड आणि/किंवा PIN चा फसवणूकी द्वारे वापर किंवा गैरवापर केला जाण्याची शक्यता आहे तर धारक आणि ग्राहक, संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे, नियम व अटींमध्ये स्पष्ट केलेल्या पद्धतीने बँकेला याविषयी कळवण्यासाठी जबाबदार असतील.

x. ग्राहक विशिष्टपणे सहमत आहे, मान्य करतो आणि समजतो की कोणत्याही स्वरुपाच्या कोणत्याही ऑफर्स (योजना, भेटवस्तू, सूट इत्यादी) त्या विशिष्ट ऑफरच्या अटी आणि नियमांच्या अधीन आहेत

xi. ग्राहक पुढे सहमत आहे आणि मान्य करतो कि ऑफर अंतर्गत उत्पादने/सेवांच्या वापरामुळे किंवा विना-वापरामुळे ग्राहकाला/धारकाला, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे झालेल्या कोणत्याही नुकसान, हानि किंवा अपायासाठी, कोणत्याही प्रकारे बँकेला उत्तरदायी किंवा जबाबदार ठरवले जाणार नाही. वर दिलेल्या बाबींविषयी कोणताही पूर्वग्रह न ठेवता, बँक कोणतीही पूर्वसूचना न देता एखादी ऑफर समाप्त करू/ मागे घेऊ शकते/ त्यात सुधार करू शकते. व्यापारीत आस्थापने द्वारे सूचित केल्यानुसार ऑफर समाप्तीच्या तारखेनंतर किंवा बँकेद्वारे बदललेल्या तारखेनंतर, जसे प्रकरण असेल त्यानुसार, ऑफर सुरु ठेवण्यासाठी बँकेवर कोणतेही बंधन असणार नाही. या व्यतिरिक्त,

ऑफरच्या दरम्यान, पूर्वसूचनेसह, ऑफरच्या अटी आणि नियम जोडण्याचा/ फेरफार/ बदल/ सुधार करण्याचा किंवा ऑफरला, पूर्णपणे किंवा आंशिकपणे, दूसऱ्या ऑफरने, सारख्याच किंवा अन्यथा, बदलण्याचा अधिकार बँकेकडे सुरक्षित आहे.

xii. बँक सर्व यशस्वी ATM/ डेबिट कार्ड व्यवहारांसाठी, रकमेचा विचार न करता, बँकेकडे नोंदणीकृत असलेल्या ग्राहकाच्या/ धारकाच्या मोबाइल क्रमांकावर सूचना पाठवेल. कोणत्याही अयशस्वी/ नाकारण्यात आलेल्या व्यवहारासाठी सूचना पाठवल्या जाणार नाही.

6. **वापरावरील मर्यादा**

दररोज खात्यातील व्यवहाराच्या किमान आणि/किंवा कमाल एकूण रक्कम मर्यादित करण्याचा अधिकार बँकेकडे राखीव आहे आणि अशा मर्यादा पुढे खात्यातील स्पष्ट रकमेच्या उपलब्धतेच्या अधीन आहेत. ग्राहक मान्य करतो आणि समजतो कि दैनिक किमान आणि/किंवा कमाल व्यवहाराच्या मर्यादा सर्व (भारतातील आणि भारताबाहेरील) साधनांवर लागू होतात आणि वेगवेगळ्या शेयर्ड नेटवर्कशी संबंधित वेगवेगळ्या साधनांवर त्या वेगळ्या असू शकतात. बँकेद्वारे सेट केलेल्या एकंदरीत कमाल मर्यादावर धारकाला त्याच्या/तिच्या स्वतःच्या मर्यादा सेट करण्याची सुद्धा परवानगी आहे. वेगवेगळ्या ATMs/ मायक्रो ATMs/ नेटवर्क द्वारे व्यवहारांसाठी या मर्यादींमधील एकसमानतेच्या अभावामुळे ग्राहकाला झालेल्या कोणत्याही नुकसान किंवा असुविधेसाठी बँक उत्तरदायी किंवा जबादार असणार नाही.

7. **रिवॉर्ड योजना**

बँक एखाद्या ATM/ डेबिट कार्डाच्या वापरावर ग्राहकांना वेगवेगळ्या रिवॉर्ड योजना पुरवू शकते. ग्राहक समजतो आणि मान्य करतो कि अशा कोणत्याही रिवॉर्ड योजनांसाठी विशिष्ट अटी आणि नियम लागू होतील ज्या बँकेद्वारे तिच्या विवेकाधिकारानुसार निश्चित केलेल्या असू शकतात आणि जसे ग्राहकाला कळवले जाऊ शकतात. व्यापारी आणि/किंवा उत्पादन निवडण्यात अंतिम निर्णय बँकेचा असेल जेथे ग्राहक ATM/ डेबिट कार्ड वापरून रिवॉर्ड पॉइंट्स कमवू शकतो. ग्राहक समजतो आणि मान्य करतो कि जर रिवॉर्ड पॉइंट्स कमावण्यासाठी, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, ATM/ डेबिट कार्डाचा गैरवापर केला जातो किंवा चूकीचा वापर केला जातो किंवा कोणत्याही पळवाट किंवा त्रुटीचा फायदा घेण्यासाठी वापरला जातो, तर कमावलेले रिवॉर्ड पॉइंट्स/ रिवॉर्ड योजना रद्द करण्याचा किंवा कमावलेले रिवॉर्ड पॉइंट्स गोठवण्याचा किंवा समाप्त करण्याचा आणि कोणत्याही प्रकारच्या किंवा स्वरुपाच्या कोणत्याही दायित्वाशिवाय अमान्य किंवा शून्य घोषित करण्याचा एकमेव अधिकार आणि विवेकाधिकार सुरक्षित ठेवते आणि या संदर्भात अंतिम निर्णय बँकेचा असेल. असा गैरवापर/ दुरुपयोग/ अयोग्य वापर/ फसवा वापर/ दुर्भावनापूर्ण वापर बँकेला ATM/ डेबिट कार्डाचा वापर किंवा उपयोग कायमस्वरुपी अस्वीकार किंवा ब्लॉक किंवा रद्द करण्याचा अधिकार देतो. पुढे ग्राहक समजतो आणि मान्य करतो कि अशा रिवॉर्ड

पॉइंट्सच्या रिडम्प्शन/उपयोगाद्वारे कमावलेली/वापरलेली रक्कम थेट ग्राहकाच्या खात्यातून कापून वसूल करण्याचा अधिकार बँकेला असेल.

8. **प्रक्रिया आणि रुपांतर फी किंवा शुल्क**

a. बँक कोणत्याही क्षणी, तिच्या विवेकाधिकाराने, पूर्व सूचना देऊन ATM/ डेबिट कार्डाचा आंतरराष्ट्रीय वापर बंद करू शकते. धारक ATM/ डेबिट कार्डाचा वापर FEMA, 1999 च्या तरतूदींच्या अंतर्गत किंवा RBI च्या अशा संशोधित योजनांनुसार, जसे वेळोवेळी लागू होऊ शकते, फक्त परदेशातील खाजगी प्रवासांकरीता परकीय चलन काढण्यासाठी आणि व्यवहारांसाठी करेल आणि इतर कोणत्याही कारणांसाठी नाही आणि याद्वारे सहमत आहे आणि पुष्टी करतो कि भारताबाहेरील वापर नियामक आणि कायदेशीर प्रतिबंध आणि मुद्रा नियंत्रण कायदे आणि सीमांच्या अधीन असेल जे वेळोवेळी त्या देशामध्ये जेथे व्यवहार केला जात आहे तसेच भारतात सुद्धा लागू होऊ शकतात. ग्राहक समजतो आणि मान्य करतो कि खाते, सुविधा आणि ATM/ डेबिट कार्ड वर लादलेल्या कोणत्याही आणि इतर सर्वच मर्यादा आणि/किंवा प्रतिबंध विदेशातील खाजगी भेटींमधील परकीय चलन काढण्यासाठी आणि व्यवहारासाठी लादलेल्या मर्यादेच्या अतिरिक्त असतील, आणि त्यापेक्षा वेगळे नाही.

b. कार्डाचा वापर पूर्णपणे भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) द्वारे वेळोवेळी जारी केलेल्या विनियम नियंत्रण नियमांनुसार केला जाईल. कार्डधारकाद्वारे याचे पालन केले न गेल्यास, कार्डधारक FEMA, 1999 आणि परकीय चलनाशी संबंधित वेळोवेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायदा आणि/किंवा नियमांच्या अंतर्गत कारवाईसाठी जबाबदार असेल. बँक किंवा RBI च्या सूचनांनुसार कार्डधारकाला आंतरराष्ट्रीयरित्या वैध डेबिट कार्ड ताब्यात ठेवण्यापासून रोखले जाऊ शकते. हे कार्ड भारतामध्येच तसेच भारताबाहेर वापरासाठी वैध असेल परंतु त्यावर “नेपाळ आणि भूतानमध्ये परकीय चलनात भरणा करण्यासाठी वैध नाही” असे नमूद असेल. जर कार्ड रद्द केले जाते, मग ते विनियम नियंत्रण नियमांचे पालन न केल्यामुळे किंवा इतर प्रकारे असेल, कार्ड अस्वीकृत होईल अशा कोणत्याही कार्डाच्या वापराच्या कोणत्याही प्रयत्नासाठी बँक जबाबदार राहणार नाही, मग ते भारतात किंवा परदेशात असेल.

c. कार्डाचा वापर अशा रेमिटन्ससाठी केला जाऊ शकत नाही ज्यासाठी विद्यमान मार्गदर्शक तत्वांच्या अंतर्गत विनियम करण्याची परवानगी नाही.

d. RBI च्या विनियम नियंत्रण नियम आणि लागू कायद्यांचे पालन न केल्यामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही आणि सर्वच परिणामांसाठी धारक आणि ग्राहक नुकसानभरपाई/मोबदला देतील आणि बँकेला निर्दोष ठरवेल.

अनिवासी भारतीय भारतात जारी केलेल्या ATM/ डेबिट कार्डाच्या आंतरराष्ट्रीय वापरासाठी पात्र असतील.

e. धारक आणि ग्राहक मान्य करतात कि परकीय चलन काढण्यावर सेवा शुल्क आकारले जाईल. असे सेवा शुल्क बँकेच्या एकमेव विवेकाधिकारानुसार संशोधनाच्या अधीन असेल.

q. खाते उघडताना आणि डेबिट कार्डाकरीता अर्ज करताना ग्राहकाला कळवले जाते कि; IDFC FIRST बँक लागू नियामक मार्गदर्शक तत्वांनुसार, बँकेच्या एकमेव विवेकाधिकारानुसार, IDFC FIRST बँकेद्वारे नियुक्त केलेल्या सेवा प्रदात्याला, मग ते भारतात किंवा परदेशात स्थित असेल किंवा कोणत्याही IDFC FIRST बँक समूह संस्थेला, डेबिट कार्ड वापराच्या संदर्भात कोणत्याही क्रिया लागू करण्याचा (जसे व्यवहार प्रक्रिया, डेबिट कार्ड निर्मिती, इंवेंटरी व्यवस्थापन आणि इतर कोणत्याही डेबिट कार्ड संबंधित सेवा, आधारभूत सेवा करार) अधिकार राखून ठेवते. मी IDFC FIRST बँकेला सुरळीत आणि अखंडित प्रक्रिया आणि सेवा देण्याकरीता माझ्या कार्ड/ ॲड-ऑन कार्ड मेंबरचे तपशील आणि आमच्या खाते/ अर्जाचे तपशील तपशील, तिच्या सेवा प्रदात्यांसोबत अर्जाची प्रक्रिया, कार्ड निर्मिती आणि एम्बॉसिंग, व्यवहार आणि भरणा प्रक्रिया, रिवॉर्ड्स व्यवस्थापन सेवा, विवरणपत्र सेवा, कार्ड विशेषता/ फायद्याचा उपयोग, विक्री/ मार्केटिंग आणि डेबिट कार्डशी संबंधित ग्राहक सेवा या सारख्या क्रियाकलापांसाठी देण्यासाठी/ शेयर करण्यासाठी माझी संमती देतो/देते. अशा सेवा प्रदात्यांची विद्यमान यादी संदर्भासाठी **इथे** जोडली आहे.

3. डेबिट कार्ड

सेवा	**परिदृश्य**	**कृती**	**कार्यवाही पूर्ण करण्याचा कालावधी**
कार्ड सक्रिय करणे	नवीन कार्ड मिळाल्यावर कार्डधारकाने एकतर खाते उघडताना किंवा पुन्हा जारी केल्यावर करणे.	कार्डधारकाने मोबाइल बँकिंग किंवा नेट बँकिंग वर भेट देऊन किंवा IVR वर कॉल करुन PIN सेट करणे. एकदा PIN सेट केल्यावर कार्ड सक्रिय होते	ताबडतोब
व्यवहार प्रकार सक्षम करणे आणि पसंतीच्या मर्यादा सेट करणे.	आंतरराष्ट्रीय ATM, आंतरराष्ट्रीय PoS, ऑनलाइन आणि कॉन्टॅक्टलेस व्यवहार करण्यासाठी कार्डधारकाद्वारे केले जाणे	○ हे कार्य करण्यासाठी कार्डधारकाने मोबाइल बँकिंग किंवा नेटबँकिंगला भेट देणे. ○ हे प्रकार सक्षम करण्यासाठी मर्यादा सेट करण्यासाठी कार्डधारक शाखेत सुद्धा भेट देऊ शकतात.	ताबडतोब किंवा STP अनुसार

कार्डचे तात्पुरते ब्लॉकिंग	कार्ड न वापरल्यामुळे किंवा शोधू न शकल्यामुळे ग्राहकाला डेबिट कार्ड व्यवहार तात्पुरते थांबवायचे असल्यास करणे	○ तात्पुरते ब्लॉक करण्यासाठी कार्डधारकाने मोबाइल बँकिंग किंवा नेटबँकिंगला भेट देणे. ○ डेबिट कार्ड तात्पुरते ब्लॉक करण्यासाठी कार्डधारक शाखेत सुद्धा भेटू शकतात. ○ डेबिट कार्ड तात्पुरते ब्लॉक करण्यासाठी कार्डधारक ब्लॉकर ऑन कॉलवर सुद्धा कॉल करू शकतात. ○ कार्ड तात्पुरते ब्लॉक करण्यासाठी कार्डधारक SMS सेवा सुद्धा वापरू शकतात.	ताबडतोब किंवा STP अनुसार
कायमस्वरुपी ब्लॉक करणे	कार्ड हरवल्यामुळे किंवा खराब झाल्यामुळे ग्राहकास कार्ड कायमस्वरुपी ब्लॉक करायचे असल्यास करणे	○ कायमस्वरुपी ब्लॉक करण्यासाठी कार्डधारकाने मोबाइल बँकिंग किंवा नेटबँकिंगला भेट देणे. ○ डेबिट कार्ड कायमस्वरुपी ब्लॉक करण्यासाठी कार्डधारक शाखेत सुद्धा भेटू शकतात. ○ डेबिट कार्ड कायमस्वरुपी ब्लॉक करण्यासाठी कार्डधारक ब्लॉकर ऑन कॉलवर सुद्धा कॉल करू शकतात.	ताबडतोब किंवा STP अनुसार
कायमस्वरुपी ब्लॉक करणे आणि पुन्हा जारी करणे	कार्ड हरवल्यामुळे किंवा खराब झाल्यामुळे ग्राहकास कार्ड कायमस्वरुपी ब्लॉक करुन आणि पुन्हा जारी करायचे असल्यास करणे	○ कायमस्वरुपी ब्लॉक करुन पुन्हा जारी करण्यासाठी कार्डधारकाने मोबाइल बँकिंग किंवा नेटबँकिंगला भेट देणे. कायमस्वरुपी ब्लॉक केल्यानंतर पर्याय उपलब्ध होईल आणि कार्ड जारी करण्याच्या TAT नुसार नवीन कार्ड पाठवले जाईल. ○ डेबिट कार्ड कायमस्वरुपी ब्लॉक करुन आणि पुन्हा	ताबडतोब किंवा STP अनुसार

		जारी करण्यासाठी कार्डधारक शाखेत सुद्धा भेटू शकतात. ○ डेबिट कार्ड कायमस्वरुपी ब्लॉक करण्यासाठी कार्डधारक ब्लॉकर ऑन कॉलवर सुद्धा कॉल करू शकतात.	
व्यवहाराचे विवाद	खात्यातून चुकीच्या पद्धतीने कापले गेल्यास व्यवहाराचे विवाद मांडणे	○ विवाद मांडण्यासाठी कार्डधारक बँकर ऑन कॉलला कॉल करु शकतात किंवा शाखेत भेट देऊ शकतात	ताबडतोब किंवा STP अनुसार

डेबिट कार्ड विवादाचे समाधान

बँक RBI द्वारे निर्धारित केलेल्या TAT च्या अनुषंगाने सर्व विवाद सोडवेल.

- ग्राहक डेबिट कार्ड वापरून ATM/POS/ECOM वरील अयशस्वी व्यवहारांशी संबंधित विवाद बँक माध्यमांशी म्हणजेच बँकर ऑन कॉल (BOC) किंवा शाखेशी संपर्क करुन मांडेल.
- डेबिट कार्डाशी संबंधित अयशस्वी व्यवहार, दावा न केलेली रक्कम, विवादाचे समाधान खालील TAT च्या अनुसार अपेक्षित आहे

	ATM	**POS**	**ECOM/ऑनलाइन**
देशांतर्गत	T+5	T+5	T+5
आंतरराष्ट्रीय	T+10	T+10	T+10